प्रेस नोट

अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : १४.०९.२०२२

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | १) श्री.दामोदर नारायणराव धुमाळे, वय ६५ वर्ष, ग्रा.प. सदस्य मुऱ्हा देवी, ता.अजनगाव सुर्जी जि.अमरावती.<br>२) श्री.मनोज नंदलालजी कावरे, वय ४३ वर्ष, ग्रा.प. सदस्य मुऱ्हा देवी, ता.अजनगाव सुर्जी जि.अमरावती.<br>३) श्री.लालदास देवरावजी वानखडे, वय ४३ वर्ष, ग्रा.पं. सदस्य मुऱ्हा देवी, ता.अजनगाव सुर्जी जि.अमरावती.<br>४) मोहम्मद इब्राईम अब्दुल नबी, वय ६०वर्ष, ग्रा.पं. सदस्य मुऱ्हा देवी, ता.अजंनगाव सुर्जी जि.अमरावती.<br>५) श्री.शिवदास काशिनाथ पखाने, वय ५२ वर्षे, व्यवसाय – शेती, ग्रापचायत सदस्य यांचे पती (खाजगी व्यक्ती)<br>६) श्री.सुरेश दुर्योधन वानखडे, वय ४२ वर्ष, व्यवसाय – शेती, उप सरपंच यांचे पती (खाजगी व्यक्ती) |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | १४/०९/२०२२ चे १३/२० ते १३/५८ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केलेली लाच रक्कम | ५५,०००/– रूपये तडजोडीअंती ४८,०००/– रूपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | ४८,०००/– रूपये |
| ७ | घटनास्थळ | त्रिमुर्ती फोटो स्टुडीओ ॲण्ड रेडीयम आर्ट, अंजनगाव सुर्जी ते दर्यापुर रोड, ता.अंजनगाव सुर्जी जि.अमरावती. |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार हे जिल्हा परीषद प्राथमीक शाळा मुऱ्हा बु. येथे प्रभारी मुख्याध्यापक असुन त्यांनी सन २०२१ ला शाळा डिसमेन्टल करून हर्रास केली. या संदर्भात ग्रामपंचायत सदस्य श्री.दामोधर नारायणराव धुमाळे व लालदासभाउ वानखडे यांनी त्यांची तक्रार मा.शिक्षणाधिकारी, जि.प. अमरावती यांचेकडे तक्रार दिली होती. सदर तक्रार मागे घेण्याकरीता श्री.धुमाळे व वानखडे हे ५५,०००/– रूपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत दिनांक १३/०९/२०२२ रोजी सविस्तर तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दि.१३/०९/२०२२ रोजी पचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान श्री.दामोधर नारायण धुमाळे, व श्री.मनोज नदलालजी कावरे दोन्ही ग्रामपंचायत सदस्य यांनी तडजोडीअंती २५,०००/– रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले. लागलीच ग्रामपंचायत सदस्य श्री.लालदास वानखडे यांची पडताळणी केली असता त्यांनी १०,०००/– रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ८,०००/– रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले. तसेच श्री. शिवदास काशिनाथ पखान (ग्रामपचायत सदस्य यांचे पती), ग्रामपंचायत सदस्य मोहम्मद इब्राईम उब्दुल नबी व उपसरपच यांचे पती श्री.सुरेश दुर्योधन वानखडे यांनी प्रत्येकी ५,०००/– रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दिनांक १४/०९/२०२२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष श्री. मनोज नंदलालजी कावरे यांनी स्वत:करीता व श्री.दामोदर नाराणराव धुमाळे यांचे करीता २५,०००/– रुपये लाच रक्कम स्विकारली. तसेच श्री.लालदास वानखडे यांनी तक्रारदार यांचे कडुन २३,०००/– रूपये लाच रक्कम स्विकारून श्री.शिवदास पखान (ग्रापचायत सदस्य यांचे पती) व मोहम्मद इब्राईम अब्दुल नबी यांना प्रत्येकी ५,०००/– रूपये लाच रक्कम दिली. व स्वत:ने ८,०००/– रूपये व श्री.सुरेश वानखडे यांचे ५,०००/– रूपये स्वत:कडे ठेवुन घेतले. वरून वरील नमुद आरोपी याना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. नमुद आरोपींविरुध्द पो.स्टे. अंजनगाव सुर्जी, अमरावती ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.अरुण सावंत, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती श्री.संजय महाजन, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.सतीश उमरे, पो.नि.योगेशकुमार दंदे, पो.नि. संतोष इंगळे, पो.ना.युवराज राठोड, पो.ना. विनोद कुंजाम, पो.ना. कुणाल काकडे, पो.ना. रविंद्र मोरे, पो.ना. रोशन खंडारे व चालक श्री. प्रदीप बारबुध्दे, श्री.गोवर्धन नाईक यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क : अँन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
ऑफीस फोन नं.०७२१–२५५२३५५, मो.नं.७०२०६९३४८१
टोल फ्रि नंबर – १०६४

सतिश श्री. उमरे
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती